# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २२४ वा ❑ बुधवार दि.२९ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## एआय मुळे लाखो नोकऱ्या धोक्यात

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) वेगाने नोकऱ्या काढून टाकत आहे. अलिकडेच, मायक्रोसॉफ्ट, टीसीएस, इंटेल, टेस्ला, गुगल, मेटा आणि अमेझॉनसह अनेक मोठ्या कंपन्यांनी १,००,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. कंपन्या एआयकडे वळत असल्याने आणि त्यात गुंतवणूक करत असल्याने, लाखो तरुणांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत.

एआय अनेक नोकऱ्यांची जागा घेऊ शकते, विशेषतः ज्या नोकऱ्या वारंवार किंवा नियमित कामांशी संबंधित असतात. काही अंदाज असे सूचित करतात की एआय आणि ऑटोमेशन २०३० पर्यंत ३०० ते ८०० दशलक्ष नोकऱ्यांवर परिणाम करू शकतात. तथापि, एआय नवीन नोकऱ्या देखील निर्माण करेल आणि अनेक नोकऱ्यांचे स्वरूप बदलेल.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम () च्या ''फ्यूचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५'' नुसार, पुढील पाच वर्षांत एआय ९२ दशलक्ष नोकऱ्या काढून टाकेल. जुन्या कौशल्यांची गरज हळूहळू नाहीशी होईल. नोकरीच्या बाजारात टिकून राहण्यासाठी तांत्रिक कौशल्ये शिकणे आवश्यक होईल. जे स्वतःला अद्ययावत ठेवतात तेच भविष्यात त्यांच्या नोकऱ्या टिकवून ठेवू शकतील.

फ्युचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५ मध्ये असे म्हटले आहे की तांत्रिक बदल, भू-आर्थिक विखंडन, आर्थिक अनिश्चितता, लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि हरित संक्रमण, वैयक्तिकरित्या आणि एकत्रितपणे, २०३० पर्यंत जागतिक कामगार बाजारपेठेत बदल घडवून आणू शकतात.सर्वात वेगाने वाढणाऱ्या कौशल्यांच्या यादीत एआय आणि बिग डेटा हे आघाडीवर आहेत, त्यानंतर नेटवर्क आणि सायबरसुरक्षा तसेच तंत्रज्ञानाचे ज्ञान येते. २०३० पर्यंत, शारीरिक कौशल्य, सहनशक्ती आणि अचूकता यासारख्या कौशल्यांची मागणी झपाट्याने कमी होईल आणि तांत्रिक ज्ञानाची जागा सर्जनशील विचारवंत, अनुकूलता आणि उत्सुक शिकणाऱ्या कौशल्यांनी घेतली जाईल.

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि टेस्लाचे सीईओ एलोन मस्क यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) बद्दल त्यांनी म्हटले आहे की भविष्यात ते सर्वांच्या नोकऱ्या घेईल. यानंतर, लोक शेती करण्यास मोकळे असतील.मस्क यांनी एक्स प्लॅटफॉर्मवरील (पूर्वी ट्विटर) एका पोस्टला उत्तर देताना हे विधान केले. मस्क यांनी लिहिले की एआय आणि रोबोट्स सर्व नोकऱ्या घेतील. लोकांना भाज्या खरेदी करण्याऐवजी त्या वाढवण्याचा पर्याय असेल. मस्क यांनी २२ ऑक्टोबर रोजी ही पोस्ट केली होती.

खरं तर, एक्स वापरकर्त्याने पोस्ट केली की अमेझॉन येत्या काळात ६०,००० लोकांना बदलणार आहे. त्याऐवजी, कंपनी एआय आणि रोबोट्सना कामावर ठेवेल. एलोन मस्कने या पोस्टला उत्तर देताना लिहिले की एआय आणि रोबोट्स भविष्यात सर्व नोकऱ्या काढून घेतील.

विशेष म्हणजे मस्कच्या कंपन्या एआय आणि स्वायत्त ऑप्टिमस रोबोटवर काम करत आहेत. एआय कंपनीला एक्सएआय म्हणतात, तर टेस्ला रोबोटवर काम करत आहे. मस्कच्या रोबोटचे व्हिडिओ आणि फोटो अनेक वेळा समोर आले आहेत, त्यापैकी बरेच व्हायरल झाले आहेत.

एआय मुळे डाटा एन्ट्री, क्लार्क, ग्राहक सेवा, टेलीमार्केटिंग एकाउंटिंग आणि बुककीपिंग,ट्रांसपोर्टेशन या क्षेत्रातील नोकऱ्या प्रभावित होणार असल्या तरी सर्जनशीलता आणि मौलिकतेमध्ये एआय अद्याप मानवांची जागा घेऊ शकत नाही.जटिल निर्णय घेण्याची, रणनीती आणि मानवी संवादाची गरज असल्याने वकील आणि न्यायाधीशांची भूमिका कायम राहील, जरी एआयचा वापर सहाय्यक म्हणून केला जाऊ शकतो. डॉक्टर आणि परिचारिकांसारख्या नोकऱ्यांमध्ये मानवी स्पर्श आणि निर्णय घेण्याची क्षमता महत्त्वाची राहील. अध्यापन आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये मानवी सहानुभूती, प्रेरणा आणि मार्गदर्शन आवश्यक आहे. व्यवस्थापन आणि नेतृत्व यामध्ये मानवी निर्णय, रणनीती आणि संबंध निर्माण करणे आवश्यक राहील.


# ज्येष्ठ कलावंत मानधन समितीवर डॉ.शेषराव पठाडे यांची नियुक्ती

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक, कलावंत मानधन सन्मान योजनेसाठी सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी समिती गठीत केली असून, त्यात ज्येष्ठ लोककलावंत डॉ. शेषराव पठाडे व अन्य चौदा सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या समितीचे जिल्हाधिकारी अध्यक्ष आहेत. उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) हे सदस्य सचिव राहणार आहेत. समितीत अशासकीय साहित्यिक सदस्य म्हणून डॉ. पठाडे यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय रंगनाथ जोगदंड, गणेश निकम, आदिनाथ कुबेर, वशिष्ठ शिरसाट, अविनाश शिरसाट, नामदेव गायकवाड, सदानंद मगर, सीताराम मते, चंद्रकांत सावंत तसेच जि. प. सीईओ, मनपा उपायुक्त, सांस्कृतिक संचालनालयाचे सहायक संचालक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचा समिती सदस्य म्हणून समावेश आहे. लोककलावंत, कलाकार यांना वृद्धापकाळात जीवन सुखकर जावे, यासाठी शासनाकडून योजना राबविली जाते. या क्षेत्रातील ज्येष्ठ आणि गरजू व्यक्तींना दरमहा पाच हजार रुपये मानधन दिले जाते.

कलावंतांना न्याय देणार शाहीर-पत्रकार डॉ. शेषराव पठाडे केंद्र सरकारच्या सेंटर फॉर कल्चरल रिसोर्सेस अँड ट्रेनिंग (सीसीआरटी) चे सीनियर फेलो असून. त्यांची चार पुस्तके प्रसिद्ध आहेत. ''पेशवेकालीन शाहिरी लावणी वाङ्मय'' या विषयावर त्यांनी संशोधन केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभागात चार वर्षे तासिका तत्त्वावर त्यांनी सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केलेले आहे. शासनाच्या वतीने गेल्या तीन ते चार वर्षांपासून विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार आणि प्रसार त्यांनी कलापथकामार्फत केलेला आहे. राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय पातळीवर लोककला विषयांरव संशोधन पेपर त्यांनी सादर केलेले आहेत. पत्रकारितेतही त्यांना ३० वर्षांचा अनुभव असून, वार्ताहर ते वृत्तसंपादक-




निवासी संपादक पदापर्यंत त्यांनी विविध आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये काम केलेले आहे. माझ्यावर टाकलेल्या विश्वासास तडा न जाऊ देता नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून गरजवंत, ज्येष्ठ-श्रेष्ठ वयोवृद्ध साहित्यिक आणि लोककलावंतांना मानधन देण्यासाठी आम्ही सगळे प्रामाणिक प्रयत्न करू, असे त्यांनी ''ज्योतिर्मय साहित्य'' यांच्याशी बोलताना सांगितले. या योजनेसाठी अर्ज आपले सरकार पोर्टलवरून ऑनलाइन भरावा लागतो. जिल्ह्यातील प्रलंबित अर्ज समितीने निकाली काढावेत आणि गरजूंना न्याय द्यावा, अशी अपेक्षा कलावंत बाळगून आहेत.

# साताऱ्याचा ग्रंथमहोत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

साताऱ्याचा ग्रंथमहोत्सव व ग्रंथ प्रदर्शनाला जोडून छोटेखानी साहित्य संमेलन डिसेंबर १९९९ सालच्या अखेरीस नवीन शतकाच्या आगमनावेळी चालू झाले.पहिल्या वर्षापासून 'डायमंड बुक सेल्स' चे सर्वेसर्वा दत्तात्रेय गंगाराम पाष्टे विशेषतः अनेक उत्तमोत्तम शैक्षणिक पुस्तके घेऊन पुस्तकांची विक्री व आनंद या ग्रथमहोत्सवात सहभागी होऊन घेत आहेत. साताऱ्यात अजूनही पुस्तकांचे स्वतंत्र दुकान नाही. साताऱ्याच्या ग्रंथमहोत्सवावर मनस्वी प्रेम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे दत्तात्रय पाष्टे. सुरवातीच्या ग्रंथमहोत्सवाच्या आठवणी सांगताना ते म्हणतात... सातारा ग्रंथ प्रदर्शन म्हणजे एक पर्वणी. त्याकाळात शनिवार-रविवार प्रचंड गर्दी आणि असाधारण ग्रंथांची विक्री होई. अनेक शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये आणि वैयक्तिक खरेदी करणारे ग्राहक यांनी अख्खा





परिसर व्यापून जायचा. प्रथम तीन दिवसाचा हा ग्रंथमहोत्सव वाचकांच्या, मराठी साहित्य संमेलनासाठी येणाऱ्या रसिकांचा प्रतिसाद बघून चार दिवसांचा सुरू झाला. साताऱ्यात उत्तम वाचक आहेत, जे या प्रदर्शनाची वर्षभर वाट पाहतात व काहीजण यासाठी पैसे साठवून पुस्तके विकत घेतात. या ग्रंथमहोत्सवाला बेळगांव, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील जावली खोरे, माण, खटाव,महाबळेश्वर ते अगदी महाडपासून पुस्तके खरेदी करण्यासाठी वाचक येतात. माझे वय आता ७० वर्षाचे आहे. उत्पन्न मिळविणे हे आता फायनान्शियली साऊंड असल्याने दुय्यम ठरत असताना साताऱ्याच्या ग्रंथमहोत्सवात 'डायमंड बुक' च्या स्टॉलवर बसणे आणि वाचकांच्या चेहऱ्यावरील नेमके मिळालेले पुस्तक बघून आनंद बघणे हे मला महत्वाचे वाटते.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

माझी आणि दत्तात्रेय पाष्टे यांची गट्टी जमली जेंव्हा अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे संमेलन मी आणि विनोद कुलकर्णी यांनी सातारा येथे ५ वर्षापूर्वी घेतले तेंव्हापासून. पाष्टे या संस्थेचे उपाध्यक्ष तर राजीव बर्वे अध्यक्ष. नुकतीच पाष्टे यांची पुण्यात मुलाखत ऐकण्याचा योग आला आणि अभिजात मराठी भाषेसाठी त्यांचे असणारे नियोजनाचे योगदान लक्षात आले. २००५ सालापासून 'डायमंड बुक सेल्स' याने प्रकाशन क्षेत्रात पदार्पण करून मराठीमधून संदर्भग्रंथांची असलेली विलक्षण वानवा भरून काढण्यात यश मिळविले आहे. तसेच शैक्षणिक संदर्भग्रंथांच्या बरोबरच कोशवाङ्मय निर्मितीची विशेष भर करीत अल्पावधीतच 'डायमंडने प्रकाशन' संस्थेने स्वतःची वेगळी ओळख कोशवाङ्मय या ग्रंथ प्रकारात करून दिली आहे. एकीकडे शैक्षणिक पुस्तकनिर्मितीचे काम वेगाने सुरू असताना गेल्या काही वर्षांमध्ये डायमंडने उत्तमोत्तम अनुवादित साहित्यकृती, तसेच वैचारिक, समीक्षात्मक ग्रंथसंपदाही मोठ्या प्रमाणात निर्माण केली आहे. ४७ हून अधिक मराठी ज्ञानकोश व शब्दकोश त्यांनी प्रकाशित केले आहेत.

**(क्रमशः)**




## संपादक मित्र झाले प्रकाशक...

श्री.संजय व्यापारी सर, प्रिंट मीडिया क्षेत्रातील एक अनुभवी व्यक्तिमत्व श्री संजय व्यापारी हे ज्योतिर्मय या ई दैनिकाचे संपादक-प्रकाशक म्हणून लौकिक-प्राप्त आहेत. केवळ साहित्याला वाहिलेले ई दैनिक प्रकाशित करण्याचे व्यावसायिक धाडस करणाऱ्या संजय व्यापारी यांचे कौतुक करावे लागते. प्रिंट आणि कला या दोन्ही क्षेत्रातला दीर्घ कार्यानुभव पाठीशी असल्याने श्री.संजय व्यापारी यांच्यासाठी हे क्षेत्र कठीण मुळीच नाही. केवळ साहित्यासाठीचे असलेले हे दैनिक उपलब्ध करून देत साहित्यिकांना लेखन -सक्रिय ठेवले आहे " त्यांचे हे साहित्यिक कार्य मौलिक आहे". याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. जुने -नवे असे साहित्यिक, लेखक, कवी, कवयित्री नित्य नेमाने ज्योतिर्मय मधून लिहितांना सध्या दिसत आहेत. या ई दैनिकाचा दिवाळी अंक -२०२५ नुकताच प्रकाशित झाला असून वाचनीय, देखणा असा या दिवाळी अंकाचा उल्लेख करतो. अशा या साक्षेपी संपादक मित्राने आता "पुस्तक प्रकाशन" या क्षेत्रात यशस्वी पदार्पण करतांना जोरदार हॅट्ट्रिक "केली आहे.

श्री गिरीश वसेकर यांची दोन पुस्तके- १. पापा - पालक आणि पाल्य यांच्यासाठी लेख, २. टांग टिंग टिंगा -बालकविता संग्रह आणि सौ.रचना वसेकर यांचा "निसर्ग गंध " कविता संग्रह, अशी ही तीन पुस्तके ज्योतिर्मय प्रकाशनाने प्रकाशित केली आहेत या साहित्यिक दांपत्याची ही पहिली पुस्तके आहेत. या पुस्तकांचा प्रकाशन समारंभ पुण्यात २५ ऑक्टोबरला संपन्न झालाय.

वरील तीन पुस्तकांपैकी एक -टांग टिंग टिंगा " या बालकविता संग्रहास माझी प्रस्तावना आहे. ज्योतिर्मय प्रकाशनाच्या शुभारंभीच्या पुस्तकात माझा असा सहभाग खूप छान वाटणारा आहे.

श्री संजय व्यापारी सर यांनी प्रकाशक म्हणून ज्योतिर्मय प्रकाशनाच्या वरील पुस्तकांच्या निर्मिती सुंदर प्रकारे करून साहित्यिकांसाठी आश्वासक दालन खुले केले आहे.

ज्योतिर्मय प्रकाशन व प्रकाशक-मित्र श्री.संजय व्यापारी यांना खुप खूप शुभेच्छा.

✍लेखन स्नेही
अरुण वि.देशपांडे-पुणे. ९८५०१७७३४२

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-७८



*राशी-चक्रातील "मिथुन" ही रास तिसऱ्या क्रमांकाची आहे. ही रास वायु तत्वाची असून तिच्यावर बुध ग्रहाचे स्वामित्व आहे. 'मिथुन' या शब्दाचा, अर्थ कांही गोष्टींवर अवलंबून आहे. या राशीचे चिन्ह जुळ्या भावांचे वा 'जुळ्या मुलांचे 'आहे. मग 'जुळे, "जोडपे', 'Twin' (जेमिनी) अशा विविध आशयांनी 'मिथुन' कडे पाहीले जाते. 'जेमिनी' हे एक खाजगीरित्या चालणारे क्रिप्टोकरन्सी एक्सचेंज आहे.*


*२१ मे ते २१ जून या काळात जन्म झालेल्या बाळाची राशी साधारणपणे "मिथुन" असते. 'द्वैत', 'मानसिक उत्सुकता', 'अनुकूलता' आणि 'संवाद' यांचे प्रतीक म्हणजे 'मिथुन' होय. पांढरा, निळा, निळ्या रंगाच्या छटा या रंगांचा या राशीशी अधिक संबंध येतो. निळ्या रंगाचा प्रभावी रंग मानवं जातं.*

*ह्या राशीचे लोक स्वतंत्र विचारांचे असतात, बौध्दिकतेला महत्व देणारे असतात. त्यामुळे आजच्या जमान्यात या राशीच्या जातकांना, समाजाच्या एकूण प्रवाहात चालतांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. अशा वेळी, सकारात्मक शक्तीची वृद्धी करून तसेच वातावरण बनवणारे "वास्तुशास्त्र, पेंटींग" या राशीच्या जातकांना एकप्रकारे लौकीक अर्थाने वरदानच ठरते. कारण या पेंटींगमधील घटकांमध्ये 'मिथुन' रास, तिचा स्वामी, तिचा रंग, प्रतिक वा चिन्ह, नक्षत्र आदींचा समावेश असतो. इतक्या बारीक तपशीलांसह जेव्हा हे पेंटींग बनते तेव्हा 'पेंटींग' मधील सकारात्मक रंगाकार हे जातकाच्या राशीवर व नक्षत्रावर 'सकारात्मकच' परिणाम करतात. त्यामुळे जी जी कमी असते त्या त्या राशीच्या गुणधर्मामध्ये, ती ती उणीव रंग भरून काढतात जातकाच्या जीवनामध्ये..!! असे अनुभव 'मिथुन' राशीच्या कांही जातकांनी सांगितले आहेत.*

*रंगांमधील तेजो किरणांनी, परिणामकारक लाभ होतात असे सिद्ध झालेले आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग" म्हणजे जनुकाही चाळणीच असते. संबंधित राशीच्या जातका पर्यंत, फक्त चांगले, लाभदायक आणि सकारात्मकच रंगकिरणे पाठवून वातावरण प्रसन्न करायचे तसेच जातकाच्या दैनंदिन जीवनातील अडी-अडचणी, अडथळे, कौटुंबिक आणि आर्थिक वातावरण सुदृढ आणि आनंदी बनवायचे. असे अद्भुत वाटणारे अनुभव, "पेंटींग" धारकांना सहजपणे येतात. यात आता नाविन्य नाही.*

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

सासू आत्याबाई
लेकाला सांगा खरं
तूमचा सासुरवास
झाला गाव भर, ||३१९||

साळीचे तांदूळ
फटकले सुपात
मऊ मऊ भात
शिजवला तुपात ||३२०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## सोडा रेडी टू इट, खा घरचेच नीट




### उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

हे पाकिटबंद पदार्थांचे आणि रेडी टू ईट पदार्थांचे लोण आपल्याकडेही मोठ्या प्रमाणात पसरत चालले आहे. आज भारतातील मुंबई पुण्यासारख्या अनेक शहरांमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांना वेळ नसल्यामुळे असे पदार्थ खाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे सध्या जी मॉल संस्कृती निर्माण झाली आहे ती पण काही अंशी याला कारणीभूत आहे. मॉलमध्ये जाणे आणि खरेदी करणे हे गरजेपेक्षा जास्त हौशीचे आणि प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. मॉलमध्ये फिरत असताना आपण अशा अनेक पदार्थांची खरेदी करतो की जे आवश्यक नसतात. त्यामध्ये खाण्याच्या पाकिटबंद पदार्थांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. त्यात आपल्या आवडीचे अनेक पदार्थ असतात. काही तयार पदार्थ आणि काही रेडी टू कूक. जसे ढोकळे, बाकरवडी, गुलाबजाम इ. अनेक भाज्यांची पाकिटेही मिळतात. असे अनेक पदार्थ दुकानांमध्ये मिळतात. मंडळी, या पदार्थांचे शेल्फ लाईफ वाढवण्यासाठी त्यात अनेक धोकादायक रसायने, म्हणजेच प्रिझर्वेटिव्हज वापरलेले असतात. तेव्हा भरमसाठ पैसे देऊन असले पदार्थ खरेदी करून आपण आपल्या आरोग्याची हानी करून घेत असतो.




आपल्या व्याख्यानात डॉ. अविनाश सावजी असे म्हणाले की या संदर्भात गांधीजींनी सांगितलेले एक साधे सोपे सूत्र आपण लक्षात ठेवू या. गांधीजी म्हणाले होते जे पदार्थ नाशिवंत असतात किंवा लवकर नासतात, कुजतात ते पदार्थ आरोग्यास चांगले असतात. मी जेव्हा हे प्रथम ऐकले तेव्हा मला सुरुवातीला त्यांचे विधान विचित्र वाटले. की नाशिवंत पदार्थ आरोग्याला चांगले कसे असतील ? हा वरवर पाहता विरोधाभास वाटतो. पण ते खरे आहे. उदा. आपल्या घरी बनवलेली भाजी, पोळी,भाकरी लवकर खराब होते. दुसऱ्या दिवशी ते पदार्थ शिळे होतात. हे नाशिवंत पदार्थ आहेत. ते ताजे असतानाच आपण खातो आणि खाल्ले पाहिजेत. जेवढे आपण घरी बनवलेले ताजे पदार्थ खाऊ तेवढे आपले आरोग्य चांगले राहील.

शास्त्रज्ञानी आरोग्यासाठीच्या केलेल्या संशोधनात असे आढळून आले की ताजे आणि स्वच्छ पदार्थ आपल्या आरोग्यासाठी चांगले असतात. स्वच्छ म्हणजे पाकिटबंद पदार्थ नाहीत ही गोष्ट पुन्हा येथे लक्षात घेतली पाहिजे. पाकिटबंद पदार्थ जसे तेल, मीठ, साखर आपल्याला स्वच्छ दिसतात पण प्रत्यक्षात ते तयार करताना त्यात धोकादायक रसायनांचा वापर केलेला असल्याने ते आरोग्यास अपायकारक असतात. त्याऐवजी साधे मीठ, गूळ, घाण्यावर काढलेले तेल आरोग्यासाठी चांगले आहेत. तसेच घरातील फ्रिजमध्ये आपण अनेक पदार्थ साठवून ठेवतो. बऱ्याच वेळा आठवडभरासाठीच्या भाज्या आपण घेऊन ठेवतो. पण फ्रिजमध्ये ठेवल्या तरी त्यातील पोषक घटक नष्ट होतात, त्या शिळ्या होतात. म्हणून शक्यतो ताज्या भाज्या, फळे विकत घेऊन खाल्ली पाहिजेत. अशा पद्धतीचा ताजा आहार माणसाचे आरोग्य वाढविण्यास व तारुण्य टिकविण्यास मदत करतो.

तेव्हा शक्य तो घरी बनवलेले पदार्थच खाऊ या. शिवाय ते पदार्थ मोठ्या प्रेमाने आपल्या आईने, पत्नीने बनवलेले असतात त्याची सर बाहेरच्या पदार्थांना कशी येणार ?

***



### दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## देवशोधन

**ज्योतिर्मय साहित्य**

समर्थाच्या मते उत्तम पुरूष कोण तर जो आत्मज्ञानी सिद्धपुरूष आहे तो उत्तम पुरूष आहे. आता आपण द्वे या संकल्पनेचा विचार केला तर जो आपल्याला सन्मार्गाच्या वाटेवरून चालायला शिकवतो. उत्तम विचार, आचार,सारासार विवेक बुद्धीने वागणारा. कुणालाही न दुखावता आचार, विचार, उच्चार या त्रीसुत्राच्या मार्गावरून जो चालतो अशा शक्तिला आपण देव म्हणतो. तर आत्मस्वरूप हाच खरा देव आहे. त्याचा शोध घेऊन त्यास पहाणे हे माणसाचे प्रथम कर्तव्य आहे. आत्मज्ञानाचा शोध कसा घ्यायचा ते समजण्यासाठी आत्मज्ञानी पुरूषाचा शोध घ्यावा.

अनुग्रह - अनु +ग्रह-आशिर्वाद देणे, स्विकार करणे. आधार व आश्रय देणे. आपल्या मनातले सर्वोच्च कोटीतील पद गुरूला देणे. तो सद्गुरूना श्रेष्ठपद बहाल करतो. तेही शिष्य त्याचा स्विकार करतात. स्वस्वरूपाचा मार्ग अंतरीचा व सुक्ष्म आहे. तिथे आपल्याला मार्गदर्शन करणारा स्वानुभवीच असावा.

सद्गुरू आपला मार्गदर्शक असतो. तो आपल्या गुणदोषासह स्विकार करतो. तो आपण साधना करत असताना सदैव पाठीशी असतो. अनुग्रह म्हणजे एक प्रकारचा शक्तिपातच असतो. अनुग्रहीत शिष्य कोठेही असला तरी सद्गुरू मधील निघालेला आशिर्वाद सुक्ष्म शक्तीचा प्रवाह त्याच्या पर्यंत पोहचतो. त्याच्या भोवताली संरक्षण कवच, वलय निर्माण करतात. साधनेमधे त्याला सतत मदत करतात. सामान्य जीव अल्प असतो. **(क्रमशः)**



### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## मीपणा ठेवून देवाकडे पाहणाऱ्यासस त्याची प्राप्ती होत नाही.

**ज्योतिर्मय साहित्य**

देवाला आपण जाणू म्हणून तो जाणला जाईल का ? मला ब्रह्म कळले म्हणून शब्दाने सांगितले तर ब्रह्म कळले असे होत नाही. जो ब्रह्म कळले असे म्हणतो, त्याला खरे म्हणजे काहीच कळले नाही असे होते. ते कळून घेऊ म्हणून कळत नाही; ते न कळतच कळते, आणि मग ' मला कळले ' ही भावनाच तिथे राहात नाही. मी ब्रह्माला ओळखीन असे म्हणून जो देवाजवळ गेला, त्याला काहीच प्राप्ती होणार नाही. मीपणाने जो देवाला पाहू जातो, त्याला देवाची प्राप्ती होत नाही. आपला अहंकारच देवाच्या प्राप्तीच्या आड येतो; आणि तो बरोबर घेऊनच जर आपण देवाला शोधू लागलो तर तो कसा सापडेल ? आपल्या आणि देवाच्यामध्ये आपल्या अहंकाराचा पातळ पडदा असतो, आणि तो असल्यामुळे आपल्याला देव दिसत नाही. तो दूर करा म्हणजे देव दिसू लागेल.

व्यापार चांगला चालला नाही म्हणजे मग विचारायला येता की, तुम्ही व्यापार करायला सांगितला पण चांगला चालत नाही; पण त्याचबरोबर नामस्मरण करायला सांगितले होते आणि ते करीत नाही, हे मात्र सांगायचे नाही ! नामस्मरण केल्याने व्यापारात बिघाड येईल का ? तुम्ही म्हणाल की, आमच्या संसारात तुम्ही बिघाड करायला सांगता; परंतु मी बिघाड करायला सांगत नसून, माझ्या सांगण्यावरून तुम्ही नामस्मरण केले तर उलट तो चांगलाच होईल. काळजी न करता संसार करा. रामाला जे करायचे, ते तुम्ही काही केले तरी करायला तो चुकत नाही. मग काळजी करून तरी काय होणार आहे ? जे भोगायचे ते कष्टाने भोगण्यापेक्षा आनंदाने भोगलेले काय वाईट ! जे जे आघात होतील ते त्याचे म्हणून त्याच्याकडे पाठवावेत. आपल्याला त्यांच्याशी कर्तव्य नाही असे समजत जावे. आपल्याला नवस करायचा असेल तर असा करावा की, '' मला तू ज्या स्थितीत ठेवशील त्या स्थितीत आनंद दे, म्हणजे मला समाधान राहील. दुसरे काही मागण्याची इच्छाच होऊ देऊ नको '' असे मागावे, म्हणजे आपल्याला त्याचे होऊन राहता येईल. मनुष्याची शांती बिघडायला जगामध्ये दोनच कारणे आहेत. एक म्हणजे आपल्याला हवे ते न येणे, आणि दुसरे म्हणजे आपल्याला नको ते येणे. या दोन्हीपैकी आपल्या हातामध्ये एकही नाही; मग आपण दुःख का करावे ? भगवंताच्या नामाची एकदा गोडी लागली ना, की सर्व काही साधते. नाम अभिमानाचा नाश करते. नामाने हवे-नको-पणाची बुद्धी होत नाही. साधुसंतांनी आवर्जून सांगितलेले हेच नाम तुम्ही सतत घेऊन समाधानाचा शाश्वत ठेवा मिळवा.

भगवंताजवळ असे काही मागा, की पुन्हा दुसरे काही हवेसेच वाटणार नाही.



## शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे,
नागपूर

### भटकंती...

**ज्योतिर्मय साहित्य**

आता हिंदीलाही महत्व आलेलं आहे. कारण आज भारताची ती गरज आहे. स्पर्धा परीक्षेत महाराष्ट्रातील मुलांना बरोबर हिंदी येय नसल्यानं ती मुलं देशातंर्गत होत असलेल्या स्पर्धेत टिकत नाहीत. म्हणूनच हिंदी पहिल्यावर्गापासून शिकविण्याचा निर्णय. ज्याला आज राजकीय संघटनांकडून विरोध होत आहे. म्हटलं जात आहे की त्याचा विद्यार्थ्यांवर ताण येतोय. परंतु देशातील सर्वच भाषा विद्यार्थ्यांना येणं अनिवार्य आहे. त्यादृष्टीनेच हिंदीचा प्रयोग.

आज इंग्रजीचं प्रस्थ पाहता मराठी शाळेची असलेली ही स्थिती अगदी पहिल्या दिवशीपासूनच आपल्याला पाहायला मिळते. ती म्हणजे शाळेत विद्यार्थी उपस्थिती कमी असणे. तसं पाहता मराठी माध्यमाच्या शाळेची स्थिती चिंताजनक आहे. कारण त्या शाळेत पटावर मुलंच दिसत नाहीत. असतात तिही नाममात्र. तशीच ती पहिली ते चौथीची मुलं एकाच वर्गात बसतात. अशीच स्थिती आढळून येते.

मराठी शाळेची स्थिती अशी चिंताजनक असल्यानं शासनाला मराठी शाळेची चिंता पडली. त्या पुर्ण स पडल्यास गरिबांच्या मुलांना कसं शिकवावं? त्यातच ती जर शिकली नाही तर देशातील साक्षरतेचे प्रमाण कसं वाढवावं? हा प्रश्न मराठी शासनासमोर उभा राहिला. त्यामुळंच की काय, कसंही करुन मराठी शाळेत मुलं वाढावी म्हणून त्यांनी विचार केला व त्या मुलांची संख्या वाढविण्यासाठी शासनानं नवीन धोरण आणलं. ते म्हणजे विद्यार्थ्यांचं पहिल्याच दिवशी शाळेत स्वागत करायचं. शाळेत रांगोळी काढायची. शाळा सजावट करायची. विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यायची. त्यांना फुलं द्यायची. पुस्तकं द्यायची. गणवेश द्यायचा. त्यातच त्यांची जास्त पटसंख्या वाढण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करायचा. यातूनच शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचं स्वागत केल्यानं, गणवेश दिल्यानं वा पुस्तके दिल्यानं विद्यार्थ्यांची मराठी शाळेतील पटसंख्या वाढेल असं शासनाला वाटलं. परंतु कितीही केलं तरी पळसाला पानं तीन याप्रमाणेच विद्यार्थी मराठी माध्यमाच्या शाळेत वाढले नाहीत. उलट होती तीच स्थिती आहे. मराठी माध्यमाच्या शाळेत पटसंख्या वाढो अगर न वाढो. परंतु विद्यार्थ्यांचं स्वागत झाल्यानं विद्यार्थ्यांना अतिशय आनंद झाला आहे. मुठभर का होईना, विद्यार्थी शाळेत येणार आहेत. परंतु ते पुर्णकालीक टिकतील का? ही शंका आहे. कारण ज्यावेळेस ग्रामीण भागात शेतीची कामं सुरु होतात. त्यावेळेस नक्कीच ही मुलं गायब होतात. आज शिक्षणाचं महत्व वाढलं असलं तरी. तसं पाहता सरकारचं ब्रीदच आहे की देशातील सहा ते चौदा वर्षाची सर्व मुलं शाळेत यायला हवीत. ती सातवीपर्यंत टिकायला हवीत व त्यांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवं. आता कॉन्व्हेंटच्या शिक्षणानं देशात पाऊल ठेवताच शिक्षणाचं महत्त्व वाढलं. त्यामुळंच की काय, आज शिक्षण शिकत असतांना मुल सहा वर्षाचं झालं की तो शाळेत येतो. तसं पाहता शाळेत नापास करण्याची पद्धती नसल्यानं ती मुलं शाळेत चौदा वर्षपर्यंत टिकतातही. परंतु दर्जेदार शिकत नाहीत. दर्जेदार शिक्षण शिक्षक देत असतील तरी. याला जबाबदार आहे आजची आस्था आणि अनास्था. **(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री
सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**


सुखं त्वं सुखस्यापि मातः प्रदेहि
धनं देहि भक्तिं समाधानमेव।
सदा ते स्वरूपं विलोक्याम्ब मुग्धो
भवामीति भाग्यं महन्मे च मन्ये ।।१२०।।

हे माते, तू सुखाचेही सुख आहेस. मला धन दे. भक्ती दे. समाधान दे. हे अंबे, तुझे स्वरूप पाहून मी सदैव मुग्ध होतो, हे माझे महद् भाग्य मी मानतो.

नेच्छा मम विरामस्य तथापि विरमाम्यहम्।
सलीलपूर्णनेत्राभ्यामम्बे नतोऽस्मि रेणुके।।१२१।।

हे माते, रेणुके, माझी विरामाची इच्छा नाही. तरीही अश्रूपूर्ण नेत्रांनी तुला नमस्कार करून थांबतो.

।। इति श्रीदेवीकृपया चन्द्रहासेन विरचितंश्रीरेणुकाशरणम् ।।



## संत गाडगेबाबा

सौ शुभांगी हेमंत पांगरकर,
छ.संभाजीनगर
मो. 94222 14122

**ज्योतिर्मय साहित्य**

### वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे महाराज

ज्ञानोबापासून ते गाडगेबाबांपर्यंत सर्व संतांचे म्हणणे एक देव हा देवळात नाही, दगडात नाही, माणसात आहे पण दुर्दैवाची गोष्ट माणसातला परमेश्वर लोकांना अजून दिसत नाही. कीर्तन हे गाडगे महाराजांचे खरे सामर्थ्य आपल्या व-हाडी भाषेत बोलून सर्वांना मंत्रमुक्त करून ठेवत कोणत्याही गावात त्यांनी पाऊल टाकले की पहिल्याने हातातला झाडू चालू लागेल जणू काही त्यांना सांगायचे होते हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे हे सूत्र ध्यानी ठेवोनी खरे ।आपुले ग्रामची करावी गोजिरे।शहराहूनि लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याकरता त्यांनी कीर्तनाचा मार्ग अवलंबविला स्वच्छता झाल्याने काय होईल हे सांगण्याकरता अभंगाची योग्य ती उदाहरणे देत

सर्वांनी स्वच्छ शिस्तबद्ध व्हावे।
परस्परांशी प्रेम करावे।
तरीच गाव स्वर्ग व्हावे। सर्वतोपरी ।।

स्वच्छतेबरोबरच लोकांच्या मनातील अंधश्रद्धा अनिष्ट प्रवृत्तींविरुद्ध विरोध करणारे झुंजार संत गाडगे महाराज लोकांचे अज्ञान दूर करताना ते म्हणत जैसी ज्याची भावना त्याने तैसीचे मानावी देवता मना। परि न चुकावी उपासना सत्कर्माची सत्कर्म केल्यानेच ईश्वर भेटतो त्यासाठी मूर्तिपूजा करायची गरज नाही कर्तव्य करत रहा त्यानेच मोठेपणा मिळतो फक्त मूर्तीच धरुनी बसणे हे वेडेपणाचे लक्ष नाही पण लोकांनी देवळात भजन करावी बाहेर येता खोटे भाषण करावे हे कितपत योग्य आहे हे आपल्या मनाला विचारा आणि सांगा देवळात नाही तर आपल्या कर्तव्य गुणात आहे असे बाबांचे किर्तन एक दोन तास चालत राहायचे हजारो लोक देहभान विसरून शब्द नी शब्द आपल्या हृदयात साठवून ठेवत.

ऐसेची समजोनी संतजने। केले ग्रंथ, गीते, भजने । तैसेची आज पाहिजे नव्याने। भजनी करावी गाव जागृती। हृदयाजागृती, कार्यजागृती सर्वांनी लागावे सत्कर्माप्रति।

***



## आरोग्य संजीवनी

### कॅंल्शियमची कमतरता

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या शरीरात रस, रक्त, मांस, मेद ,अस्थी ,मज्जा व शुक्र हे सात धातू असतात. हे शरीराचे धारण करतात म्हणून यांना धातू असे म्हणतात. या सात धातू पैकी अस्थिधातूमुळे आपल्या शरीराला आकार प्राप्त होतो.या अस्थिधातूमध्ये कॅल्शियम हा महत्त्वाचा घटक असतो . कॅल्शियम मुळे शरीरातील जैविक घटकांचे संतुलन कायम राहते .आपल्या आहारातून मिळणाऱ्या कॅल्शियम मुळे रक्तामधील कॅल्शियमचे प्रमाण योग्य राहते .कॅल्शियम मुळे पेशीचे आरोग्य उत्तम राहते .स्नायूंच्या बदलामुळे शरीरातील हाडांच्या संरचनेमध्ये बदल होत असल्याने कॅल्शियमची गरज जास्त प्रमाणात असते .शरीरातील मणके, अस्थी यामध्ये शक्ती टिकून राहण्यासाठी तसेच स्नायू व हृदयाचे कार्य सुरळीतपणे चालण्यासाठी कॅल्शियमची आवश्यकता असते. शरीरातील रक्त गोठण्याच्या प्रक्रियेत देखील कॅल्शियमचे महत्त्व खूपच असते . कॅल्शियम हा दात व अस्थि यामधील मूलभूत घटक असल्याने शरीरातील पेशींच्या कार्यांबरोबर पेशींचे विभाजन, रक्तसंचलन ,हाडाचे आकुंचन व प्रसारण यासाठी कॅल्शियमची आवश्यकता असते.

शरीरातील कॅल्शियम हे विटामिन डी. थायराइड ,हार्मोन्स आणि कॅल्सीटोनील याद्वारे नियंत्रित केले जाते. त्यामुळे शरीरातील व रक्ताची कॅल्शियमचे प्रमाण नेहमी योग्य राहते विटामिन डी आतड्यातील व किडनीतील कॅल्शियम रक्तामध्ये शोषून घेण्यासाठी मदत करते. आपल्या शरीराला विटामिन डी ही कोवळ्या सूर्यप्रकाशातून मिळत असते . विटामिन डी च्या कमतरतेमुळे हाडातील कॅल्शियम कमी होऊन हाडे ठिसूळ होतात. याशिवाय आहारातून कॅल्शियम युक्त पदार्थांचे सेवन न करणे, पचनशक्ती मंदावणे यामुळे आहारातील कॅल्शियमची शोषण कमी होते तसेच स्त्रियांना मासिक पाळीत अतिरिक्त स्त्राव होणे, स्त्रियांची मासिक पाळी येणे बंद झाल्यानंतर हार्मोनचे संतुलन बिघडणे व ऊन आणि शारीरिक श्रमांचा अभाव, गोड पदार्थांची अति सेवन करणे ,नवजात बालकांना मातेचे दूध न मिळणे यामुळे देखील कॅल्शियमची कमतरता निर्माण होते .प्रत्येक स्त्रीमध्ये मासिक पाळी बंद झाल्यानंतर शरीरातील हार्मोन्सची संतुलन बिघडल्याने संपूर्ण शरीरातील हाडे ठिसूळ लागतात. या दिवसांमध्ये फक्त आहारातून कॅल्शियम घेऊन पूर्तता शकत नाही त्यासाठी आयुर्वेदिक कॅल्शियमची औषधे घेणे गरजेचे असते अन्यथा स्त्रियांच्या शरीरातील हाडे ठिसूळ होऊन थोडाश्या आघाताने देखील भग्न होऊ शकतात .

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

अनेक स्त्रियांना हाता पायांना मुंग्या येणे, मणक्याचे विकार उद्भवणे,मान व कंबर दुखणे, सकाळी उठताना त्रास होणे, चालताना त्रास होणे ,मांडी घालून जास्त वेळ बसू न शकणे. शौचाला बसता न येणे ,चक्कर येणे, गुडघेदुखी ,लवकर थकवा येणे ,दात दुखणे, नखे ठिसूळ झाल्याने तुटणे, केस गळणे, सतत भीती वाटणे, ताण तणाव जाणवणे ,स्मरणशक्ती कमी होणे व झोप न लागणे अशा अनेक प्रकारच्या त्रासांना तोंड द्यावे लागते तथापि बहुतांश स्त्रियां त्याकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात .


स्त्रियांनी वयाच्या पन्नाशीनंतर आहारात कॅल्शियम पदार्थांचे प्रमाण वाढवावे. त्यासाठी कँल्शियम युक्त आहाराचे सेवन करावे.पुढील पदार्थ हे कँल्शियमयुक्त असतात. त्यांचा आहारात समावेश करावा.

**(क्रमशः)**

# अधुऱ्या कहाणीचा शेवट

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


प्रत्येकाच्या तारुण्यात एखादी प्रेयसी किंवा प्रियकर (कदाचित एकतर्फी) असते. कालांतराने वृध्दापकाळात ती प्रेयसी किंवा प्रियकर भेटल्यावर जुन्या आठवणी जाग्या होतात. जुना काळ आठवतो. त्या प्रियरम्य आठवणीत मन रममाण होते. गध्देपंचविशीतल्या त्या एकतर्फी प्रेमाला जर अंकुर फुटला तर आपले संसारी जीवन बरबाद होते. तेव्हा वेळीच मोहाला आवर घालावा व सावध व्हावे. जुने सत्य आता कसे आठवावे तयाने जिवाला किती जाळवावे, असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. या साऱ्या मधुर आठवणीवरच मनुष्य जगत असतो. सौ. वृंदा कांबळी यांचा अधुऱ्या कहाणीचा शेवट हा कथासंग्रह वाचला.




आयुष्याच्या मध्यावर कोणी जुना जीवलग परत भेटला तर जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. कुणी प्रियकर परत भेटला तर मोहात पडण्याच्या त्या क्षणी मनाला सावरावे लागते. असा संदेश देणाऱ्या या कथा आहेत. पहिल्याच कथेत आईच्या चारित्र्याबद्दल शंका व्यक्त करणाऱ्या मुलाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी आहे. मुलांच्या मनातील शंकांचे अभ्र दूर झाल्यानंतर त्याच्या मनस्थितीचे दर्शन घडविणारी ही कथा. त्याच्या आयुष्यातील शुभ्रा ही रिफ्रेशमेंट आणि आईच्या जीवनातील बेंजामिन हे प्रकरण अमेरिकेत स्थित झालेला. आपण करतो ते पाप आणि आई करते ते सगळे चुकीचे. असा समज झालेला कौस्तुभ. त्याची ही कहाणी. प्रत्येकाच्या आयुष्यात असे संशयाचे कंगोरे असतातच. ते मळभ दूर झाले की कसे स्वच्छ स्वच्छ निरभ्र होते. दुभंग या कथेतीची नायिका.रिटायर्ड झालेल्या प्रशांतच्या आठवणीत क्षणभर रमते. मनातील सारे विचार सांगण्यासाठी फार्म हाऊसवर तिला घेऊन जातो. तो तिला म्हणतो, मुळीच घाबरू नकोस, या शब्दाने तिच्या मनातील भय दूर झाले. ती निः शंक झाली. पण तिनेच त्याच्या छातीवर डोके टेकले. मग दोन मनांच्या गोष्टी सुरू झाल्या. नंतर नीतीमत्ता बाजूला ठेवून त्या ओठावर चुंबनापर्यंत कधी आल्या. नंतर ते दूर झाले विवेकाने. परत निर्धाराने आपापल्या वास्तवात परतले.

सर्वच कथांचा शेवट संयमाने होतो. विचाराने व विवेकाने होतो. आपापल्या मर्यादा सांभाळत आपापल्या संसारात त्या परत येतात. अपराधी ही दोन भावांच्या भावनांची कथा. अपंग भाऊ बोझ वाटू लागतो. त्याचे फोन व मेसेजही विनय पाहत नाही. अखेर तो भाऊ वारल्यावर विनय कर्तव्य म्हणून गावी जातो व पहाटे परतही येतो. त्याच्या नावाने दान करून त्याची प्रसिध्दी करणारा विनय. असं वर्णन लेखिका करते. ही एकच कथा थोडी वेगळी आहे.

शापित ही कथादेखील नानूच्या जीवनातील घटनांचे वर्णन करते. तो पौरोहित्य करणारा आहे. त्याचे जीवन खडतर आहे. एका स्कूटर अपघातात त्याचे निधन होते. त्याचे परजातीच्या मुलीवर प्रेम असते. पण ते यशस्वी होत नाही. नानूचा आत्मघात की घातपात असा संशय व्यक्त करते ही कथा.




हेलकावे या कथेत संजीव आणि मानसीची व्यथा आहे. संसारात रममाण झाली तरी संजीवच्या आग्रहास्तव ती त्याला चुंबन घेऊ देते. संजीव आणि तिची कॉलेज जीवनातील प्रेमकहाणी परत सजीव होऊ पाहते. कल्पना आणि वास्तव यांच्या मध्ये ती हेलकावे घेते. सगळ्याच कथा फ्लॅशबॅक पध्दतीने त्या रंगवतात.

आपल्या पूर्वायुष्यातील सुखद क्षण तिच्यासमोर येतात. त्यात ती रममाण होते. नंतर भानावर येऊन आपल्या सध्याच्या आयुष्याला ती सामोरी जाते. या कथांतील क्षण मनाला भिडणारे आहेत. साऱ्या कथा संयत आहेत. आपण आता विवाहित आहोत याचे भान प्रत्येक स्त्रीला आहे. त्या वेळीच सावरतात. मोहाला बळी पडत नाहीत. या साऱ्या कथा स्त्रियांच्या भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. पुरुषांच्या आयुष्यात देखील असे काही प्रसंग येतात. बालपणीचे नकळत केलेले प्रेम आठवते. ते मात्र अधुऱ्या कहाणीचा शेवटमध्ये भेटत नाही.

सगळ्या कहाण्या स्त्री पुरुष संबंधांवर आधारित आहेत.

अधुऱ्या कहाणीचा शेवट.

लेखिका - वृंदा कांबळी


पृष्ठे ११२, मूल्य २४५ रुपये


प्रकाशक विघ्नेश भरत गोखले,

विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली.

***

## जादूचा आरसा या बालकथा संग्रहाला संत नामदेव राष्ट्रीय बालसाहित्य पुरस्कार






**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – समृद्धी प्रकाशन, हिंगोली या संस्थेच्या वतीने मराठी साहित्यातील विविध प्रकारांसाठी राष्ट्रीय स्तरावरील संत नामदेव पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक उद्धव भयवाळ यांच्या ''जादूचा आरसा '' या बालकथा संग्रहाला नुकताच संत नामदेव राष्ट्रीय बालसाहित्य पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे.


या पुरस्काराबद्दल भयवाळ यांचे साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केलेले आहे. उद्धव भयवाळ यांनी आतापर्यंत मराठी आणि हिंदी भाषेतील विविध साहित्य प्रकारांमध्ये लिखाण केलेले असून त्यांना राज्य स्तरावरील तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

# लक्ष केंद्रित करा !

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

एकदा एक व्यक्ती अनेक विचारांनी खूप त्रस्त होती. कुठल्याही कामात त्याचे लक्ष लागत नव्हते, त्यामुळे त्याचे काहीही, कोणतेही काम साध्य होत नव्हते. त्याला कुणीतरी सांगितले की गावा बाहेर भरलेल्या जत्रेच्या पुढे नदीच्या किनारी एक साधू महाराज येऊन बसले आहेत. ते फार तेजस्वी आणि सिद्धी प्राप्त साधू आहेत. ते तुला तुझ्या जीवनातील अडचणीवर उपाय सांगू शकतील. मग तो व्यक्ती दुसऱ्या दिवशी त्या साधू कडे गेला. साधूला नतमस्तक होऊन म्हणाला, महाराज मी खूप त्रस्त आहे.

अनेक नकारात्मक विचारांनी ग्रस्त आहे. माझ्या डोक्यात अनेक विचार कायम येत असतात, हाती घेतलेले कोणतेच काम पूर्ण होत नाही त्यामुळे मी खूप नैराश्यात आहे. मला काही मानसिक आजार जडला आहे का? तेंव्हा साधू अगदी शांत स्वरात म्हणाले, भक्ता तुला कुठलाही आजार झालेला नाही. हे मी सिद्ध करू शकतो. तू तुझ्या अंगी असलेल्या कौशल्याने कोणतेही काम अगदी सहजतेने पूर्ण करू शकतो, याची ग्वाही मी देतो. तुला आता एक काम सांगतो. माझे हे कमंडलू घेऊन त्या नदीवर जा, ते पाण्याने पूर्ण काठोकाठ भरून डोक्यावर ठेवून या जत्रेत एक चक्कर मारून, त्यातील पाणी एक थेंबही न सांडता मला परत आणून दे. मला ते पूर्ण



काठोकाठ भरलेले हवे आहे. मग ती व्यक्ती ते कमंडलू घेऊन नदीकडे गेली.ते पाण्याने काठोकाठ भरून जत्रेत एक गोल चक्कर मारून साधू कडे परत आली. आणि हळूच ते कमंडलू डोक्यावरून खाली घेऊन साधू पुढे ते ठेवले.




तेंव्हा साधू म्हणाले, अरे बघ तू तर यातील एक थेंबही पाणी खाली पडू दिले नाही. ते पाण्याने काठोकाठ भरलेले आहे. तेंव्हा ती व्यक्ती आश्चर्य चकित झाली. कारण ते कमंडलू पाण्याने काठोकाठ भरलेले होते. तेंव्हा साधू त्याला म्हणाले, तू तर हे अवघड काम अगदी सहजतेने पूर्ण केले. तुला रस्त्यात कुणी भेटले नाही का? कुणी काही म्हटले नाही का? कुणाचा धक्का लागला नाही का? तेंव्हा ती व्यक्ती नम्रपणे म्हणाली, महाराज मी हे डोक्यावर घेऊन अतिशय शांततेने इकडे आलो. रस्त्यात अनेक लोक भेटले, काही म्हणाले, अरे असे केल्याने का तुझें नैराश्य जाईल? मी कुणा कडे काहीही लक्ष दिले नाही. माझ्या कामावरच पूर्ण लक्ष केंद्रित ठेवले आणि कुणाचा धक्का लागू नये म्हणून रस्त्याच्या कडेने हळूहळू इकडे आलो.

साधू महाराज हसले आणि म्हणाले, भक्ता बघ, किती कठीण काम तू अगदी सहज साध्य केलेस. अरे आपण आपल्या कार्यात, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर त्या कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करून, लोक काय म्हणतील? याकडे लक्ष न देता सकारात्मक मनाने पूर्ण केले तर अवघड असं काही नसते. ती व्यक्ती साधूला पुन्हा नतमस्तक झाली. आणि हो महाराज म्हणत माझे मन आता अगदी शांत झाले आहे म्हणून घराकडे परतली आणि भविष्यात यशस्वी उद्योगपती झाली. सांगायचे तात्पर्य हेच की शांत चित्ताने, प्रसन्न मनाने असलेल्या कामात पूर्ण लक्ष केंद्रित करून ते कार्य केले की ते पूर्ण होतेच.

# विज्ञानरत्न डॉ जयंत नारळीकर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही.


**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.










# जरासी आहट होती है....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

मन ज्या क्षणी प्रिय व्यक्तीपासून दूर राहतं, त्या क्षणी प्रत्येक लहरी, प्रत्येक आवाज ''त्याच्या'' येण्याची चाहूल ठरतो.



''आहट'' हा शब्दच संपूर्ण भावविश्व उलगडतो. ती व्यक्ती न दिसतादेखील तिचं अस्तित्व जणू हवेच्या झुळूकीतही जाणवतं. हे प्रेमाचं 'सूक्ष्म' रूप ज्याला दर्शनाची आस नसून, भासाची अनुभूती प्रिय असते.

संध्याकाळ म्हणजे दिवस आणि रात्रीच्या सीमारेषेवर उभं असलेली कातरवेळ .

त्या क्षणी मनातील स्मृतींचे दीप उजळू लागतात .

या प्रतिमेत केवळ प्रेमाचीच नव्हे तर अंतरंगातील आशा दडलेली आहे. विरहाचा अंधार जवळ येत असला तरी आठवणींच्या या छोट्याशा पणत्या त्याला हरवू पाहतात.

''मेरी नस-नस में मचलने लगी चिंगारी सी...''

इथे शरीर आणि भावना यांचं विलक्षण अद्वैत आहे.

प्रेम मनातून शरीरात आणि शरीरातून अस्तित्वात झिरपतं.

प्रेमाचा हा अनुभव केवळ रोमँटिक नाही ती आत्म्याच्या अस्तित्वाची ठळक भावना आहे जी मनाच्या नाही तर आत्म्याच्या पातळीवर उमटते. जेव्हा वारा सर्वांगाला स्पर्श करतो, तेव्हा तो स्पर्श प्रत्यक्ष नसतो पण ''त्या''चं स्मरण अधिक जिवंत असतं.

या गीतात प्रेमाची प्रतिमा नेहमीच अदृश्य आहे.

''तो'' येत नाही, दिसतही नाही पण त्याचं अस्तित्व प्रत्येक ओळीत, प्रत्येक स्वरात श्वास घेते.

*खरं प्रेम शारीर जवळिकीत नाही, तर जाणिवेत आहे*.




जेव्हा प्रिय व्यक्ती अनुपस्थित असते, तेव्हाच तिच्या अस्तित्वाचं सौंदर्य अधिक जाणवतं.

हाच प्रेमातला विरोधाभास.

अनुपस्थितीत उपस्थितीची अनुभूती.

विरहाची हुरहूर, तीव्र भावना जरी व्यक्त होत असली तरीही त्यातून सौंदर्य व्यक्त होतं, न दिसणाऱ्या व्यक्तीचं अस्तित्व ठळकपणे व्यक्त होतं.

विरह, ओढ आणि आशा असा भावनांचा त्रिवेणी संगम या गाण्यात दिसतो.

प्रेमभावनेला आत्म्याच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न आवडला. अस्तित्वाच्या स्तरावर जेव्हा कोणतीही भावना जाते तेव्हा ती निस्वार्थ होते आणि म्हणूनच ती पवित्र होते. ते पावित्र्य आत्मिक पातळीवरच अनुभवता येऊ शकतं. म्हणूनच प्रेम पूजा बनतं.

लता मंगेशकर यांचा स्वर, मदनमोहन यांचं संगीत हा या गाण्याचा आत्मा आहे.

कधी कधी काही गाणी मनात घुमत राहतात तर काही गाणी अंतरंगाला भिडतात आणि श्वासात मिसळतात. हकिकत या चित्रपटातलं हे गाणं त्या गाण्यांपैकीच एक गाणं, ज्यात विरह म्हणजे वेदना नाहीये. विरहातही एक सौंदर्य आहे.


लता मंगेशकरांच्या स्वरात ती ओढ, ती कातरता इतक्या पारदर्शकतेने उतरते की श्रोत्यांना शब्दांबरोबरच श्वासाचं संगीतही ऐकू येतं.

# सुख समाधान

ज्योतिर्मय साहित्य

''मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं'' हे गाणं अगदी घरोघरी गातात, पण आनंदाच्या क्षणी! एरवी हा फक्त प्रश्नच असतो नाही? जीवनात प्रत्येकाला भरभरून सुख तसेच भरपूर दुःख देवाने दिलेली आहेत. जो तो आपापल्या परीने ते दुःख सोसुन सुख अनुभवण्यासाठी प्रयत्न करत असतो. रात्र सरता पहाट होणं जसं टळत नाही, तसेच वाईट दिवस सरता सुखकर काळ येण्या वाचुन राहत नाही. खरं तर वाईट काळात सुद्धा खूप काही चांगलं असतं, अगदी सगळंच दुःख करण्यासारखं नसतं. पण दोष तुमच्या दृष्टीचा असतो. सतत जे नाही त्याबद्दल हळहळ करणे, भविष्यात काय वाईट होवू शकतं याची चिंता करणे, प्रत्येक गोष्टीत चांगले शोधण्यापेक्षा वाईट काय आहे हेच पाहणे इत्यादी ! अशी वृत्ती असलेली माणसं ना स्वतः आयुष्य आनंदाने जगतात ना आजुबाजुच्यांना जगु देतात.

एका मंदिरा बाहेर एक भिकारी शाल गुंडाळून दिवसभर भिक मागत आणि देवाचं भजन करत असे. तेथे रोज एक जोडपं दर्शनासाठी येत असे. पत्नी मंदिरात जाई आणि पती रोज बाहेर उभा राहुन तिची वाट पाहत. एक दिवस गर्दी असल्याने तिला यायला वेळ लागला. इकडे पती त्या भिकारी माणसाला म्हणाला काय लोक आहेत या दगडा समोर आपला अमूल्य वेळ वाया घालवतात. भिकारी म्हणाला साहेब हा देव आहे जो आपल्या सगळ्यांचा तारणहार आहे. तोच तर हे जग चालवतो. हा चिडुन म्हणाला, तु म्हणशीलच रे तुला त्याच्या मुळे आयत ताट मिळतं! राहायला जागा मिळते, तुला काय दुःख आहे. माझ्या भावांनी माझ्या नावाची संपत्ती हडपली. नोकरी मध्ये विरोधकांनी माझ्यावर आळ आणुन माझी नोकरी घालवली. तेव्हा आला नाही हा देव मदतीला! माझं मीच कष्टानं काम करून जगतोय. असो तुला काय सांगतोय मी... अचानक वारं सुटलं आणि त्या भिकाऱ्याची शाल उडुन पडली. आणि त्या माणसाने पाहिले की भिकाऱ्याला दोन्ही हात नाहीत. त्याला अत्यंत वाईट वाटले. तो म्हणाला अरे तुला तर किती दुःख आलंय वाट्याला तरी तु याच भजन आनंदाने करतो? भिकारी म्हणाला साहेब अहो हात नसले तरी मी भजन गातो आणि लोक मला जे मनोभावे देतात त्यावर मी जगू शकतो, हे खुप नाही का! देवाने तुम्हाला स्वतः कष्ट करता यावे असे ठेवले आहे. तुम्ही आज न उद्या सगळं मिळवाल हा विचारच किती समाधान देतो.



सौ.प्रियंका गौरव जावळे.
मो. 74208 57257

आता मात्र साहेबांचा दृष्टीकोनच बदलला, त्याने मंदिरात जाऊन देवा पुढे हात जोडून आपल्या नकारात्मक विचार आणि सतत वाईट पाहण्याच्या सवयी साठी माफी मागितली. आणि जेव्हा तो मंदीरातुन बाहेर आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर जी प्रसन्नता होती तिच त्याचे सुख समाधान दर्शवत होती !! आजच्या या निगेटिव्हीटी , नैराश्याच्या जगात मला वाटतं आपला जिवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोनच संजीवनी ठरेल!

****

# आमचा ट्रेलर बघू नका! - गोंधळ चित्रपटाच्या दिग्दर्शकाचे अनोखे आवाहन चर्चेत

ज्योतिर्मय साहित्य

सध्या मराठी चित्रपटसृष्टीत ग्लॅमरसोबतच महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरेला सन्मान देणारे चित्रपट मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत. अशाच परंपरेचा गाभा उलगडणारा बहुचर्चित गोंधळ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. टीझर प्रदर्शित झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता पसरली आहे. आता या उत्सुकतेत भर घालत दिग्दर्शक संतोष डावखर यांनी एक अनोखे आवाहन केले आहे, ''आमचा ट्रेलर बघू नका!''

आजकाल जिथे चित्रपटांच्या ट्रेलरचे जोरदार प्रमोशन केले जाते, तिथे गोंधळ टीमने उलटा प्रयोग केला आहे. दिग्दर्शक संतोष डावखर म्हणतात की, त्यांनी प्रेक्षकांना ट्रेलर न पाहाण्याचे आवाहन करून चित्रपटाबद्दलची कुतूहल वाढवण्याचा मानस ठेवला आहे. सोशल मीडियावर ही प्रमोशन स्ट्रॅटेजी सध्या जोरदार चर्चेचा विषय बनली आहे आणि प्रेक्षक या निर्णयाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी उत्सुक झाले आहेत.

संतोष डावखर म्हणतात, ''गोंधळची कथा, पात्रे आणि कलाकार अतिशय रंजक आहेत; त्यामुळे प्रेक्षकांनी ट्रेलरपेक्षा संपूर्ण चित्रपट थेट सिनेमागृहात बसून पाहावा. प्रत्येक पात्र हळूहळू गूढ उलगडत जाते. नाहीतर चित्रपटातील थ्रिल थोडा २-३ टक्के कमी होऊ शकतो. चित्रपट पाहिल्यानंतरच या कथेचा गाभा, भावना आणि महाराष्ट्राच्या परंपरेचा खरा रंग प्रेक्षकांना जाणवेल. ज्यांना चित्रपटाबद्दल काही शंका असतील, त्यांनीच ट्रेलर पाहावा. काही गोष्टी या चित्रपटात अशा आहेत ज्या ७० एमएम पटलावर प्रदर्शित होणाऱ्या भारतीय चित्रपटांमध्ये प्रथमच दिसतील.''

डावखर फिल्म्स प्रस्तुत गोंधळची कथा, पटकथा आणि संवाद संतोष डावखर यांनी लिहिले असून सहनिर्मात्या दीक्षा डावखर आहेत. चित्रपटात किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहोनी, निषाद भोईर, अनुज प्रभू, सुरेश विश्वकर्मा, माधवी जुवेकर, ऐश्वर्या शिंदे, कैलाश वाघमारे, प्रभाकर मठपती, विठ्ठल काळे, प्रवीण डाळींबकर, शरद जाधव, पूनम पाटील आणि ध्रुव ठोके यांसह अनेक कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. गोंधळ चित्रपटाचे मेकिंग यूट्यूबवर प्रदर्शित झाले असून चित्रपटात दमदार टीम असल्याचे दिसतेय. दरम्यान, ट्रेलर न पाहाण्याचे हे आवाहन प्रेक्षकांच्या उत्सुकतेत वाढ करेल की कमी, याचा परिणाम लवकरच स्पष्ट होईल.







**आज खासदार डॉक्टर भागवत कराड यांच्या हस्ते येथील रेल्वे स्थानकावर ''छत्रपती संभाजीनगर '' नामफलकाचे अनावरण करण्यात आले. डॉक्टर कराड यांनी याचे छत्रपती संभाजीनगर नामकरण कसे झाले याबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमाच्या वेळी मराठवाडा रेल्वे कृती समिती तर्फे श्री अनंत बोरकर, श्री राजेश मेहता, श्री अशोक जाधव, नितीन चित्ते तसेच बापूसाहेब देसले, दत्तू पाटील पुंडे, कैलास रिठे, रेल्वे स्थानक प्रमुख श्री सुनील बिरारे कमर्शियल ऑफिसर प्रशांत स्वामी, हंसराज मीना, आयपीएफ अधिकारी भास्करराव, अनिता बागुल, प्रशांत गंभीरराव, गणेश दळवी, हेल्थ ऑफिसर राहुल कल्याण, ओम वाघमारे आदी हजर होते.**

# तेजस्विनी

ज्योतिर्मय साहित्य

दोन वर्षांपूर्वी वनिताने आपल्या आईला आजारपणामुळे गमावलं होतं. ती त्यावेळी नुकतीच दहा वर्षांची असेल. एवढी जाणती नसताना देखील तिने वडीलांच्या दुसऱ्या लग्नाला जायच्या वेळी कसलाही दंगा किंवा रडून गोंधळ केला नाही. एरवी आईच्या आठवणीत आजीकडे जाऊन ती खूपदा रडायची पण सगळ्यांनी तिच्याशी प्रेमाने वागणारी आई आता परत येणार हे सांगितले तेव्हा पासून ती शांत होती.

एकुलती एक असल्याने तिचे फारच लाड झाले होते. तिच्या वडिलांनी तिला काही कमी पडू दिलं नाही, पण पुढील आयुष्य कसे जायचे म्हणून आजीने हट्टाने हा दुसऱ्या लग्नाचा घाट घातला. वनिता तिचे बाबा, आजी, आत्ता, काका अशी मोजकीच माणसे आवरून लग्नाला निघाली. वनिताचे बाबा शंकरराव वाड्यातल्या सोप्यात आपल्या पत्नीच्या फोटो कडे एकटक पाहत होते.''आपल्या वनिताला मी सांभाळेल तू काळजी करू नकोस हेच त्यांची नजर सांगत होती. तोवरच वाड्या समोर मोटर येऊन उभी राहिली. सारेच घाईने त्यात बसले. वनिता आजीच्या मांडीवर बसली. गाव तसे दोन तासांच्या अंतरावर होते. रस्ता आणि झाडे दोन्ही पळू लागलीत तसे शंकररावांचे मन भूतकाळात धावू लागले. लक्ष्मीशी झालेला विवाह त्यानंतरचा नवीन सुखी संसार, तिने वडीलांच्या आजारपणात आईला दिलेली साथ, पण बरेच दिवस मूलबाळ नाही म्हणून तिला होणारा त्रास आणि बऱ्याच दिवसांनी मग वनिता झाली पण त्यानंतर तिला बाळंतपणापासून अनेक व्याधी जगल्या, आणि दीर्घ आजाराने निधन झाले. वनिताचं बालपण आजी, बाबा, थोड्या वेळाकरीता आईबरोबर छान मजेत गेल होत पण अलिकडे ती जरा शांत होती. शंकररावांनी आपल्या छकुली कडे एक नजर वळवली तोवरच निमगाव मध्ये गाडी पोहचली.

समोर मोठा वाडा होता जास्त काही सजावट नव्हती पण बैठक व्यवस्था टापटीप स्वच्छता, त्यामुळे वातावरण प्रसन्न होते. सगळ्यांचा पाहुणचार व्यवस्थित झाला. मग सुमती'' ला बाहेर आणले. ती थोडी रंगाने सावळी पण नाकी डोळी नीटस होती. लांबसडक काळेभोर केस, बोलके डोळे तिच्या दिसण्यात अजून भर टाकत होते. शंकररावांची परिस्थिती सर्वांना माहीत होती. ते विधुर असले तरी जमीन जुमला, नोकर-चाकर, गाडी त्यामुळे घरात कशाला कमी नव्हती. शिवाय पे पाहुण्यांच्या ओळखीने म्हणून हे लग्न लगेच साध्या पद्धतीने मोजक्या लोकांना घेऊन पार पडले.

काही दिवसांनी सुमती नव्या संसाराची नवी स्वप्न पाहू लागली. शंकररावांना देखील लक्ष्मीची आठवण आता तितकीशी येत नव्हती. वनिता मात्र आजीकडे हट्ट करीत असे ''नवीन आई माझ्या आईसारखी कुठे आहे? ती तर फारच वेगळी आहे. तेव्हा आजी जवळ घेत तीला शांत करायची. कोवळ्या बालमनावर नियतीचे ओरखडे उठत होते. सुमतीने शंकररावाची पत्नी, घरची सून म्हणून सारे कर्तव्य केले पण ती वनिताची आई होऊ शकली नाही. सुमतीने वर्षभरातच नवीन बातमी दिली. घरात आता नवीन पाहुणा येणार म्हणून सारे आनंदून गेले. आजी सुमतीची विशेष काळजी घेत होती.

वनिताला मात्र एकटेपणाची जाणीव होत होती. तिचे वय वाढत होते अभ्यासात ती हुशार होती. तिने पाचवी नंतर शिक्षणासाठी शहरात जाण्याचे ठरवले. तीने आजीला व बाबांना आपल्या मनातील इच्छा बोलून दाखवली. जीवावर उदार होऊन आजी व बाबांनी तिला परवानगी दिली.

वनिताच्या आवडत्या शिंदे बाई तालुक्यात राहत होत्या त्यांच्या जवळ राहून शिक्षण घ्यायचे ठरले. ती मुळातच हुशार, लाघवी, मितभाषी तीचा स्वभाव त्यांना फार आवडायचा. विना आईची पोरं परक्या घरी ठेवताना आजीचा उर दाटून आला. शंकरराव उदास झाले पण शिंदे बाईंनी तिची जबाबदारी घेतली तिला स्वतःच्या मुलीप्रमाणे जवळ घेऊन तिची काळजी करत होत्या. सहा महिने झाले वनिता जाऊन आजीला करमत नव्हते. अधूनमधून तिला भेटायला शंकरराव जात होते इकडे . सुमती बाळंतपणासाठी माहेरी गेली तिला गोंडस, सुंदर असा मुलगा झाला पण दुर्दैवाने त्याला दृष्टीच नव्हती, आंधळे बाळ जन्माला आले.

शंकररावावर मोठा आघात झाला. आजी तर पुरती कोलमडून गेली.अनेक दवाखाने, उपचार, तांत्रिक मांत्रिक, वैद्य सारे काही करून पाहिले पण उपाय



कोणताही झाला नाही. सुमतीचा सगळा दिवस बाळाच्या विचारातच जात असे. वनिता सहावीत असताना दिवाळी सुट्टीत घरी आली. तिलाही समजले छोटा भाऊ काही पाहू शकत नाही. त्याच्याशी खेळताना तो फक्त आवाजाच्या दिशेने इकडे तिकडे हालचाल करतो. तीला फारच वाईट वाटले. वनिता मात्र दिवसेंदिवस हुशार होता होती. बाईंच्या संस्कारात घडत होती. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, खेळांच्या स्पर्धा अशा मध्ये भाग घेऊन आपले अस्तित्व टिकवून राहिली. सततच्या केलेल्या मेहनतीने तिचा सर्वांगिण विकास झाला. ती आता धाडसी झाली होती. सुट्टी संपली तशी जाताना वनिता बाबांजवळ गेली, त्यांचे दुःख तिला समजत होती. ती बाबांना म्हणाली,'' बाबा, तुम्ही



प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर

फार काळजी करू नका अशाने तुमच्या तब्येतीवर परिणाम होईल. शंकररावांचे डोळे भरून आले, आज लक्ष्मीची फारच आठवण आली. पोर हुबेहूब आईसारखी कुटुंबाची काळजी करणारी आणि नाती जपणारी आहे. त्यांनी मायेने तिच्या डोक्यावर हात ठेवला.

दिवसामागून दिवस जात होते असेच एके दिवशी बाईंनी वनिताला बोलवून घेतले, आणि सांगितले ''तुला मागच्या सहा महिन्यांपूर्वी क्रीडा स्पर्धत जिल्हास्तरीय बक्षिस मिळाले आहे . ''आता तू पुढे राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी हो ह्याचा तुला दहावीच्या परीक्षेत उपयोग होईल. तीने मानेनेच होकार दिला. तिला रोज उठून धावण्याच्या सराव करावा लागायचा पण ती कधीच कंटाळा करत नव्हती. सलग सहा महिने सराव केल्यानंतर तिचे क्रीडा शिक्षक तिला स्पर्धेसाठी घेऊन गेले. वेगवेगळ्या खेळांच्या अनेक स्पर्धा आणि भरपूर खेळाडू तेथे आले होते. आणि त्याचसोबत अनेक दिव्यांग खेळाडूही पाहिले जे शरीराने विकलांग पण आत्मविश्वासाने भारावलेले, परिस्थितीशी सामना करणारे आपले यश दैदिप्यमान बनवून स्वतःला उभे करणारे जीवनाचे खरे खेळाडू तिने आज पाहिले.त्यामध्ये काही अंध खेळाडू होते ते ब्रेल लिपीत शिकतात हे तिला समजले, त्यावेळेस अगदी मोठ्या शहरात

ब्रेल लिपीचे वर्ग घेतले जायचे, विचारल्यानंतर काही गोष्टी तिला समजत गेल्या आणि तिच्या मनात एका विचाराने ठाम मांडले. तिचीही स्पर्धा उत्तम रीतीने पार पडली तीने राज्यस्तरीय स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला.फारच आनंदाने ती परत आली. बाईंनी, घरातील सर्व लोकांनी तिचे

कौतुक केले. शाळेत तिचा मोठा सत्कार झाला. दहावी पास झाल्यावर तिनै राज्य सरकारने खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मुंबईला एक उपक्रम आयोजित केला होता त्यामध्ये सहभाग घेतला, आणि इथेच तिला तिच्या नव्या विचारांना दिशा द्यायची होती. तिने तेथील शिक्षकामार्फत ''ब्रेल लिपी'' कुठे शिकतात ते पाहिले, आणि तीने ती लिपीस्वतः शिकण्याची इच्छा व्यक्त केली.

ती धाडसाने ''ब्रेल लिपी'' शिकण्यासाठी तेथील अंध मुलांच्या क्लास मध्ये गेली. ''लहान भाऊ ''निखील पाच वर्षांचा झाला आहे पण तो जन्मताच अंध आहे. आणि मी एका खेडेगावात राहते, तो इकडे येऊ शकत नाही. मला तुम्ही ही लिपी शिकवाल का? असे तिने धाडसाने तिथल्या सरांना विचारले. तिच्या धाडसी स्वभावाचे कौतुक वाटले. त्यांनी तिला काही बेसिक गोष्टी शिकण्यास मदत करायला तयारी दर्शवली. तिने आपल्या राज्यस्तरीय पुरस्काराची रक्कम त्यांना देऊ केली, पण त्यांनी जुजबी रक्कम घेऊन तिला

महिनाभरात तिला ब्रेल लिपि शिक्षण दिले.

पुढे ती जेव्हा गावाकडे आली तेव्हा स्पर्शज्ञानाची भाषा तिला अवगत झाली होती. तिने बाईंना साऱ्या गोष्टी सांगितल्या, बाईंना तिचा फार अभिमान वाटला. ती आपल्या गावाकडे गेली तेव्हा घरातील सर्वांना तिने ह्यांची माहिती दिली, हळूहळू तीने निखिलला स्पर्शाने भाषेची ओळख ,छोटी छोटी अक्षरे, शिकवायला सुरुवात केली. तो हि हळूहळू तिच्या सांगण्याप्रमाणे शिकत होता.सुमती आता निखिलची प्रगती पाहून आनंदी होती. शंकयराव पण फारच खुश झाले. घरात आनंदी वातावरण झाले. पुढे जाऊन वनिताने पदवीचे शिक्षण घेतले व स्पर्धा परीक्षा देऊन पोलिस खात्यात ती उच्च पदावर कार्यरत झाली.

वनिताला आज गावात सत्कार होणार होता, शिंदे बाई तिला घडवणारे सारून शिक्षक, मित्रमैत्रिणी, नातेवाईक सारे शाळेच्या प्रांगणात जमले.निखिल देखील आनंदीत होऊन बहिणीला मिळालेले यश पेढे वाटून साजरे करत होता.सर्वांनी तिचे मनापासून कौतुक केले. शंकररावांचे हृदय

भरून आले.आजी मायेने हात वर करून कौतुक करत होती.साऱ्यांचे मनोगत व्यक्त झाले नंतर सुमती पुढे आली

आज तिच्या मनातली भावनांचा बांध फुटला, ती बोलू लागली वनिता बाळा, मी तुला कधीच समजू शकले नाही

बालपणी तुझे कधीच कौतुक केले नाही, तुझ्याशी कायम दुजा भाव केला. पण तू माझ्याशी नेहमीच चांगले वागत आलीस आज, माझा मुलगा निखिल ही अंध असूनही तुझ्या मुळे शिकत आहे.'' तुझे अनंत उपकार आहेत माझ्या वर निखिलच्या अंधकारमय जीवनाची खरीखुरी ''तेजस्विनी वनिता आहे. मी फक्त आई म्हणून त्याला जन्म दिला तिने त्याला जगण्याची दिशा दिली आहे. हे सांगताना सुमतीचे अश्रू ओघळत होते, मायलेकींची ह्या क्षणाला खरीखुरी भेट घडली. सर्वांचे मन भरून आले. घरी आल्यावर शंकरराव लक्ष्मीच्या फोटोकडे पाहत म्हणाले '' लक्ष्मी तू आम्हाला सोडून निघून गेलीस पण तुझं ,''तेजस्वी रूप माझ्या घरात आजही लखलखत आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559